# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं.०६/२०२०

श्री.अनिल गणपती ठोंबरे } तक्रार अर्जदार

विरूध्द्

१. वाळवा तालूका एज्युकेशन सोसायटी,
इस्लामपूर, ता.वाळवा, जि.सांगली
२. वसंत कॉलेज ऑफ एज्युकेशन,
इस्लामपूर, ता.वाळवा, जि.सांगली
} वि.प.

वाळवा तालूका एज्युकेशन सोसायटी, इस्लामपूर, ता.वाळवा, जि.सांगली या शिक्षण संस्थेचे वसंत कॉलेज ऑफ एज्युकेशन, इस्लामपूर, ता.वाळवा, जि.सांगली यांचेकडील शिक्षकेत्तर कर्मचारी श्री. अनिल गणपती ठोंबरे यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.२९/१२/२०२० रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये नमूद तक्रार पुढील प्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

१. मी, अनिल गणपती ठोंबरे वसंत कॉलेज ऑफ एज्युकेशन, इस्लामपूर तक्रार अर्ज करतो की मी, दि.१५/०७/१९९५ पासून वाळवा तालूका एज्युकेशन सोसायटी, इस्लामपूर येथील वसंत कॉलेज ऑफ एज्युकेशन येथे शिपाई या पदावर कायम सेवेत असून मला शासनाच्या ५ व्या, ६ व्या, ७ व्या वेतन आयोगाचा कोणताही लाभ मिळालेला नाही. **२.** महाविद्यालयांना लागू असलेल्या ग्रॅच्युईटी रक्कमेचा लाभ मिळालेला नाही. **३.** तसेच १२ वर्ष २४ वर्षासाठी असलेल्या वेतन निश्चिती व त्याचा फरक व त्यानुसार होणारा पगार मिळालेला नाही. **४.** महाविद्यालयाने माझे एकूण २१ महिन्याचे वेतन दिलेले नाही.

**महाविद्यालयाचा अभिप्राय :**

१. आमचे कॉलेजकडे श्री. अनिल ग. ठोंबरे हे दिनांक १५/०७/१९९५ पासून शिपाई पदावर कार्यरत आहेत. त्यांचा सेवा कालावधी अत्यंत खराब व डागाळलेली आहे. तक्रारदार श्री.ठोंबरे यांना वरिष्ठांचे कायदेशीर सूचनांचे पालन न करण्याची व विनापरवानगी गैरहजर आहेत. त्यांच्या सदरचे गैरहजेरी बाबत त्यांना तोंडी विचारणा केली असता काही गैरसमज करून घेऊन कामाचे ठिकाणावरून निघून जावून कॉलेज विरूध्द् व संस्थेविरूध्द् अनेक ठिकाणी खोट्या व चुकीच्या मजकुरीच्या तक्रारी

करीत आहेत. त्यामुळे कॉलेजची व संस्थेची जनमानसातील प्रतिमा डागाळली जात आहे. तक्रारदार श्री. अनिल ठोंबरे व त्यांचे नात्याने असलेले भाऊ श्री. संजय ठोंबरे यांनी आज अखेर निव्वळ संस्थेस त्रास देण्याच्या हेतूने एकूण ०२ अर्ज माहिती अधिकार कायद्यातील तरतुदींचा गैरवापर करून केले आहेत. सदर अर्जांना रीतसर खुलासे/उत्तरे वेळोवेळी दिलेली आहेत.

२. तक्रारदार श्री.ठोंबरे यांनी कधीही, कॉलेजकडे अथवा संस्थेकडे वरील संदर्भात तक्रारी अर्जामध्ये उपस्थित केलेले मुद्यांबाबत रितसर खुलासा मागणी केलेला नाही, अथवा रीतसर पत्रव्यवहार करून तक्रार असल्याबाबत कळविलेले नाही. परंतू आपले समोर तक्रार अर्जात, मात्र पान नंबर २ परि. ९ मध्ये, तक्रारीच्या संदर्भात संबधित पदाधिका-यांकडे तक्रार अर्ज केला होता का? याबाबत 'होय' तसेच असल्यास संबधितांनी उत्तर दिले काय, याबाबत 'नाही' असे खोटे व चुकीचे शपथेवर प्रतिज्ञा करून नमूद केले आहे, याची गांभिर्याने नोंद घ्यावी.

३. मा.सर्वोच्च न्यायालयाने 'श्री.किशोर समरीटे विरूध्द् स्टेट ऑफ उत्तर प्रदेश' २०१३(२) मध्ये एस.सी.सी पान नं.३९८ परि ३६ ते ३८ मध्ये नमूद केले आहे. या निवाडयाचे आधारे मा.मुंबई उच्च न्यायालय, मुंबई यांनी 'रंजना विश्वनाथ शहाणे विरूध्द् महाराष्ट्र शासन' या न्यायनिवाड्यामध्ये परि.१० मध्ये नमूद केले आहे की, खोटी माहिती वस्तूस्थिती नमूद करून तक्रार करणारे अर्जदार हे कोणतेही रिलीफ मिळण्यास पात्र नसतात. त्यामुळे निव्वळ याच कारणासाठी तक्रारदार यांचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र असलेने नामंजूर करण्यात यावा ही विनंती.

४. तसेच तक्रारदार श्री. ठोंबरे यांनी उपस्थित केलेले मुद्दे हे सन २००० पासून २०१६ पर्यंतचे असल्याचे त्यांचे अर्जावरून दिसते. तसेच सन २००० पासून अथवा २०१६ पासून म्हणजेच जवळजवळ २१ वर्षे त्यांनी कोणतीही तकार कधीही उपस्थित केलेली नसल्याचे देखील स्पष्ट होते. तसेच त्यांना मागील २१ वर्षे अथवा ५ वर्षे तक्रार अर्ज करण्यास कोणतीही अडचण अथवा कारण नसल्याचे देखील स्पष्ट होते.

५. तक्रारदार यांचा तक्रार अर्ज मुदतीत नसल्याचे स्पष्ट होते. त्याचप्रमाणे कोणत्याही तक्रारदारास कधीही, कुठल्याही कारणासाठी, केव्हांही सदर कमिटीकडे अर्ज करता येत नाही. सदर कायद्यामध्ये ग्रीव्हन्स कमिटीकडे कारण घडले पासून तक्रार अर्ज करणेसाठी मुदत कालावधी नमूद नाही. अश्या परिस्थितीत लिमिटेशन ॲक्ट मधील रेजिज्यूरी आर्टिकल ११३ नुसार तीन वर्षाची मुदत येते याची नोंद घ्यावी. त्यामुळे तक्रारदाराचा तक्रार अर्ज मुदतीत नसल्याने नामंजूर होण्यास पात्र असलेने नामंजूर करावा ही विनंती.

६. तक्रारदाराने रीतसर कॉलेजकडे अथवा संस्थेकडे त्यांचे वेतनाबाबत सेवा वेतननिश्चिती बाबतचे शंकांबाबत रीतसर अर्ज केलेस त्यांचे निराकारण केले जाईल याची नोंद घ्यावी.

७. तसेच तक्रारदार श्री.ठोंबरे हे दिनांक २९/०९/२०२० पासून विनापरवानगी गैरहजर आहेत कोव्हीड-१९ महामारीमुळे कॉलेजकडे उपस्थितीबाबत निर्बंध आहेत. त्यामुळे रोटेशन पध्दतीने कर्मचारी उपस्थितीबाबत निर्णय घ्यावे लागतात. अश्या परिस्थितीत, तक्रारदारांचे गैरहजेरीमुळे कामाचा खोळंबा होत असून कामाची शिस्त बिघडलेली आहे. तक्रारदाराचे काम इतर कर्मचा-यांचे कडून करून घ्यावे लागत आहे. तक्रारदाराचेकडून घडले गैरकृत्यांबाबत, सध्याचे शासनाचे निर्बंध व निर्देशांबाबत रीतसर कायदेशीर मत घेऊन खातेनिहाय चौकशीचे काम सुरू करीत आहे, याची नोंद घ्यावी.

८. तक्रारदाराने खोटी व चुकीची माहिती नमूद करून अर्ज केला असल्याने, तक्रारदाराने वीस वर्षापूर्वीचे कारणासाठी तक्रार केली असल्याने, तक्रारदाराचा तक्रार अर्ज मुदतीत नसल्याने, व जर तक्रारदाराने कॉलेजकडे अथवा संस्थेकडे रीतसर अर्ज केल्यास त्याचे सर्व शंकाचे निरसन होणार असलेने, तक्रारदाराचा सदर अर्ज नामंजूर केलेने तक्रारदाराचे कोणतेही नुकसान होणार नसल्याने, तक्रारदाराचा सदर अर्ज ना.सर्वोच्च न्यायालयाचा निवाडा विचारात घेऊन नामंजूर करण्यात यावा ही विनंती.

**समितीची निरिक्षणे :**

१. तक्रारदार यांनी तक्रार अर्जामध्ये महाविद्यालयाकडून ५ व्या, ६ व्या, ७ व्या वेतन आयोगाचा कोणताही लाभ मिळालेला नाही अशी तक्रार अर्जामध्ये नमूद केली आहे.

तक्रारदार यांनी या तक्रारीबाबत सदर संस्था व महाविद्यालयास वेतन आयोग लागू केलेबाबतचे कोणतेही लेखी पुरावे सोबत जोडलेले नाहीत. तसेच ५ वा वेतन आयोग लागू झाला तेंव्हा पासून वेळोवेळी तक्रार केलेबाबत अथवा ६ वा वेतन आयोग लागू झालेपासून संस्था अथवा महाविद्यालयाकडे याबाबत मागणी केलेचे दिसून येत नाही. तसेच संस्था व महाविद्यालय जे वेतन तक्रारदार यांना देत होते ते विनातक्रार स्विकारल्याचे समितीच्या निदर्शनास येते. तसेच महाविद्यालय इतर कर्मचा-यांना ५ व्या, ६ व्या तसेच ७ व्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन देत आहेत व तक्रारदार यापासून वंचित असलेबाबतही असलेबाबतचे कोणतेही लेखी पुरावे सादर केलेले नाहीत. तसेच तक्रारदार यांनी कोणत्याही वैध कारणाशिवाय त्यांचा तक्रार अर्ज दाखल करणेस असमर्थनिय विलंब केला असल्याचे दिसून येते. सबब तक्रारदार यांची सदरची मागणी समितीस मान्य करता येणार नाही.

२. तक्रारदार यांनी तक्रार अर्जामध्ये महाविद्यालयांना लागू असलेल्या ग्रॅच्युईटी रक्कमेचा लाभ मिळालेला नाही अशी तक्रार नमूद केली आहे.

या तक्रारीच्या पुष्ठार्थ तक्रारदार यांनी कोणतीही कागदपत्रे तक्रार अर्जासोबत जोडलेली नाहीत. अथवा कोणतीही माहिती समितीसमोर सादर केलेली नाही.

संस्था व महाविद्यालयाने तक्रारदार हे अद्याप महाविद्यालयाच्या सेवेत कार्यरत असून ते कामावर गैरहजर असल्याचे तसेच त्यांचे वेतन सुरू असल्याचे सांगितले. तक्रारदार यांनी आपणास महाविद्यालयाकडून या कालावधीतील वेतन मिळत असल्याचे समितीसमोर मान्य केले. तक्रारदार हे महाविद्यालयाच्या सेवेत अद्याप कार्यरत असल्याचे समितीच्या निदर्शनास येते. सबब तक्रारदार यांची मागणी समितीस विचारात घेता येणार नाही. तथापी उपदानाबाबत नियमानुसार आवश्यक असणा-या तरतूदीची कार्यवाही महाविद्यालयाने करावी असे समितीचे मत आहे.

३. तक्रारदार यांनी तक्रार अर्जामध्ये १२ वर्ष २४ वर्षासाठी असलेल्या वेतन निश्चिती व त्याचा फरक व त्यानुसार होणारा पगार मिळालेला नाही अशी तक्रार नमूद केली आहे.

तक्रारदार यांनी आपण सन १९९५ पासून महाविद्यालयाच्या सेवेत कायम असल्याचे अर्जात नमूद केले आहे. तथापी १२ वर्ष २४ वर्षासाठी असलेल्या वेतन निश्चितीबाबत त्यांनी संस्था, महाविद्यालय यांचेकडे यापुर्वी कोणतीही लेखी मागणी केलेचे दिसून येते नाही. तक्रारदार यांनी कोणत्याही वैध कारणाशिवाय त्यांचा तक्रार अर्ज दाखल करणेस असमर्थनिय विलंब केला असल्याचे दिसून येते. तसेच १२ वर्ष २४ वर्षासाठी असलेल्या वेतन निश्चितीबाबत मा.उच्च न्यायालयातील दाखल असलेल्या रि.पि. ३०३३/२०२० या कामी झालेल्या आदेश विचारात घेता तक्रारदार यांना पुर्वलक्षी प्रभावाने १२ वर्ष २४ वर्षासाठी असलेल्या वेतन निश्चितीचा लाभ देय होणार नसल्याचे स्पष्ट होते. तथापी या अनुषंगाने भविष्यात शासनाकडून काही योग्य ते आदेश निर्गमित झालेस तक्रारदार यांना योग्य त्या ठिकाणी दाद मागणेचा अधिकार राहील.

४. तक्रारदार यांनी तक्रार अर्जामध्ये महाविद्यालयाकडून सन २००० मध्ये ५ महिने, सन २००१ मध्ये ५ महिने, सन २००२ मध्ये ५ महिने, सन २०१५ मध्ये ३ महिने व सन २०१६ मध्ये ३ महिने असे एकुण २१ महिन्याचे वेतन थकीत असल्याचे नमूद केले आहे. तथापी या तक्रारीच्या पृष्ठार्थ त्यांनी कोणतीही माहिती समितीसमोर सादर केलेली नाही.

संस्था, महाविद्यालयाने दिलेल्या लेखी अभिप्रायामध्ये तक्रारदार श्री. ठोंबरे यांनी उपस्थित केलेले मुद्दे हे सन २००० पासून २०१६ पर्यंतचे असल्याचे त्यांचे अर्जावरून दिसते. तसेच सन २००० पासून अथवा २०१६ पासून म्हणजेच जवळजवळ २१ वर्षे त्यांनी कोणतीही तक्रार कधीही उपस्थित केलेली नसल्याचे देखील स्पष्ट होते. तसेच त्यांना मागील २१ वर्षे अथवा ५ वर्षे तक्रार अर्ज करण्यास कोणतीही अडचण अथवा कारण नसल्याचे देखील स्पष्ट होते असे नमूद केले आहे.

याबाबत समितीचे मत असे की, तक्रारदार यांनी २१ महिन्यांच्या थकीत वेतनाच्या तक्रारीच्या अनुषंगाने लेखी पुरावे, कागदपत्रे अथवा बॅंक स्टेटमेंट इत्यादी कोणतीही माहिती सादर केलेली नाही. तसेच थकीत वेतनाबाबत सन २००० ते सन २०२० पर्यंत त्यांनी कोणत्याही प्रकारे संस्था, महाविद्यालयाकडे मागणी केलेली नसल्याचे दिसून येते. तक्रारदार यांनी सन २००० ते अर्ज दाखल करेपर्यंत म्हणजेच सन २०२० पर्यंतच्या कालावधीमध्ये थकीत वेतनाबाबत त्या त्या वेळी संस्था, महाविद्यालयाकडे तशी मागणी करणे आवश्यक होते. तथापी त्यांनी कोणत्याही वैध कारणाशिवाय अर्ज दाखल करण्यास विलंब केला असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे तक्रारदार यांची सदरची मागणी मुदतबाह्य झालेने समितीस ती मान्य करता येणार नाही. सबब समिती खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

तक्रारदार यांच्या तक्रार अर्जातील नमूद सर्व मागण्या अमान्य करण्यात येत आहेत.

झालेल्या निकालाच्या प्रती संबधितांना देवून तसे कळविण्यात यावे.

दिनांक : 2 4 AUG 2022

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(डॉ. एन.बी.गायकवाड)

सदस्य
(श्री.ए.ए.कुलकर्णी)

सदस्य
(डॉ.एस.एस.महाजन )

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए. कदम)

अध्यक्ष
(श्री. एस.पी.कुलकर्णी)

शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर